# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः09.09.2025** **वारःमंगळवार**

---

**ठळक बातम्या**

1. उपराष्ट्रपतीपदासाठी आज निवडणूक; सी पी राधाकृष्णन आणि बी सुदर्शन रेड्डी यांच्यात लढत
2. भारताला पुन्हा एकदा उद्योग आणि ज्ञानाचं जागतिक केंद्र बनवण्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं आवाहन
3. हिमाचल प्रदेश आणि पंजाबमधील पूरपरिस्थितीचा पंतप्रधान नरेंद्र मोदी आज घेणार आढावा
4. नेपाळमध्ये समाज माध्यमांवरील बंदीविरोधात तरुणांनी केलेल्या निदर्शनांना हिंसक वळण; 19 जणांचा मृत्यू

आणि

5. 17व्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेला आजपासून दुबईमध्ये सुरुवात; भारताचा उद्या यूएईबरोबर पहिला सामना

**आता सविस्तर बातम्या**

**<u>उपराष्ट्रपतीपदासाठी -निवडणूक</u>**

भारताच्या उपराष्ट्रपतीपदासाठी आज निवडणूक होणार आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उमेदवार आणि महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची लढत इंडिया आघाडीचे उमेदवार आणि सर्वोच्च न्यायालयाचे माजी

न्यायाधीश बी सुदर्शन रेड्डी यांच्याबरोबर होणार आहे. उपराष्ट्रपतीपदाची निवड ही संसदेच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांच्या गुप्त मतदानाद्वारे केली जाते. सध्या लोकसभेत 542 तर राज्यसभेत 239 सदस्य आहेत त्यामुळे एकंदर मतदारांची संख्या 781 असून निवडून येण्यासाठी 391 मतांची आवश्यकता आहे. प्रकृतीच्या कारणास्तव जगदीप धनखड यांनी जुलै महिन्यात उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा दिला होता त्यामुळे ही निवडणूक घेण्यात येत आहे. आज सकाळी 10 ते संध्याकाळी 5 वाजेपर्यंत मतदान होणार असून संध्याकाळी सहा वाजता लगेचच मतमोजणी होणार आहे.

**<u>राष्ट्रपती</u>**

भारताला पुन्हा एकदा उद्योग आणि ज्ञानाचं जागतिक केंद्र बनवावं असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. त्या काल नवी दिल्लीत आयोजित अभियांत्रिकी निर्यात प्रोत्साहन परिषदेच्या वर्धापनदिन कार्यक्रमात बोलत होत्या. देशाची अर्थव्यवस्था सक्षम आणि स्वावलंबी असण्यावर तसंच निर्यातीत वाढ होण्याच्या गरजेवर त्यांनी भर दिला. देशाच्या विकासात लघु, मध्यम आणि सूक्ष्म उद्योगांचं योगदान महत्त्वाचं असल्याचं सांगत व्यावसायिक आव्हानांचं संधीत रूपांतर करण्याची गरज राष्ट्रपतींनी अधोरेखित केली. जागतिक अस्थिरतेचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर कमीत कमी परिणाम जाणवेल इतकी भक्कम - आत्मनिर्भर भारताची अर्थव्यवस्था असावी, अशी अपेक्षा मुर्मू यांनी व्यक्त केली.

**<u>मोदी-पंजाब/हिमाचल</u>**

हिमाचल प्रदेश आणि पंजाब राज्यातल्या पूर परिस्थितीचा तसंच मदत आणि पुनर्वसन कार्यांचा सविस्तर आढावा घेण्याकरता पंतप्रधान नरेंद्र मोदी आज या दोन्ही राज्यांच्या दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्यात आज दुपारी पंतप्रधान हिमाचल प्रदेशातील धर्मशाला इथे राज्य सरकारी अधिकाऱ्यांसोबत उच्चस्तरीय आढावा बैठक घेणार आहेत. पुरामुळे बाधित झालेल्या स्थानिक लोकांशी ते संवादही

साधतील. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलांच्या पथकांना भेटून मोदी हिमाचल प्रदेशातील भूस्खलनग्रस्त भागांचं हवाई सर्वेक्षण करतील.
हिमाचल प्रदेशानंतर, पंजाबच्या पूरग्रस्त भागांचीही पंतप्रधान हवाई मार्गाने पाहणी करतील. तिथल्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन पूरग्रस्त नागरिकांशी ते संवाद साधणार आहेत.

**<u>मॉरिशस पंतप्रधान दौरा</u>**

मॉरिशसचे पंतप्रधान डॉ. नवीनचंद्र रामगुलाम आणि त्यांच्या पत्नी वीणा रामगुलाम आजपासून आठ दिवसांच्या भारत दौऱ्यावर येत आहेत. पंतप्रधान डॉ. रामगुलाम यांनी यापूर्वी मे 2014 मध्ये भारताला भेट दिली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शपथविधी समारंभाला उपस्थित राहण्यासाठी त्यांना आमंत्रित करण्यात आलं होतं. भारत दौऱ्यादरम्यान, पंतप्रधान रामगुलाम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतील. दोन्ही देशातील धोरणात्मक सहकार्य आणखी मजबूत करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशीही ते चर्चा करतील. डॉ. रामगुलाम मुंबई, वाराणसी, अयोध्या आणि तिरुपतीलाही भेट देणार असल्याचं परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

**<u>आधार</u>**

सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला आधार कार्ड हे 12 वे कागदपत्र म्हणून गृहीत धरण्याचे निर्देश दिले आहेत. यामुळे बिहारमधील सुधारित मतदार यादीत तिथल्या मतदारांना आपलं नाव समाविष्ट करण्यासाठी आधार कार्ड ओळखीचा पुरावा म्हणून सादर करता येणार आहे. म्हणजेच मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी आधार कार्ड हा एक स्वतंत्र पुरावा म्हणून सादर करता येईल. तथापि, आधार हा नागरिकत्वाचा पुरावा नाही असंही सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्ट केलं आहे.

**<u>ईद</u>**

ईद-ए-मिलाद म्हणजे हजरत महंमद पैगंबर यांची जयंती काल ठीकठिकाणी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यंदाचं वर्ष हे दीड हजारावं जयंती वर्ष असल्यामुळे मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने यामध्ये सहभागी झाले होते.

हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात

**<u>नेपाळ</u>**

नेपाळमध्ये प्रमुख समाज माध्यम मंचांवर बंदी घातल्याच्या सरकारच्या निर्णया  विरोधात तरुणांनी केलेल्या निदर्शनांना काल हिंसक वळण लागलं; यात 19 जणांचा मृत्यू झाला तर 300 हून अधिक जखमी झाले. त्यानंतर नेपाळ सरकारने काही समाज माध्यमांवर बंदी घालण्याचा आपला यापूर्वीचा निर्णय मागे घेतला आहे. मंत्रिमंडळाच्या आपत्कालीन बैठकीनंतर नेपाळचे माहिती आणि प्रसारण मंत्री पृथ्वी सुब्बा गुरुंग यांनी घोषणा केल्यानुसार सरकारने समाज माध्यमांच्या साइट्सवर बंदी घालण्याचा आपला पूर्वीचा निर्णय मागे घेतला आहे. पंतप्रधान केपी शर्मा ओली यांनी आंदोलना दरम्यान घडलेल्या घटनेची चौकशी करण्यासाठी एक चौकशी समिती स्थापन करण्याचे आश्वासन दिलं आहे. मृतांच्या कुटुंबाला मदत दिली जाणार असून जखमींवर मोफत उपचार केले जाणार आहेत. नेपाळचे गृहमंत्री रमेश लेखक यांनी नैतिकतेच्या आधारावर राजीनामा दिला आहे.

**<u>इस्रायल बस हल्ला</u>**

जेरुसलेममधील एका वर्दळीच्या एका प्रमुख चौकात काही बंदूकधारी लोकांनी बसवर गोळीबार केल्यामुळे काल किमान सहा जण ठार तर 12 जण जखमी झाले आहेत. हल्ल्यानंतर दोन दहशतवाद्यांना लगेचच पकडण्यात आल्याची माहिती  इस्रायल पोलिसांनी दिली आहे.

दरम्यान जेरुसलेममध्ये निष्पाप नागरिकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा पंतप्रधांन नरेंद्र मोदी यांनी तीव्र निषेध केला आहे. भारत सर्व प्रकारच्या दहशतवादाचा कायमच निषेध करतो. दहशतवादा विरोधात शून्य सहनशीलतेच्या आपल्या धोरणावर भारत ठाम असल्याचं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**भारत न्यूझीलंड**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील परराष्ट्र कार्यालय स्तरावरील सल्लामसलतीचा सहावा टप्पा काल नवी दिल्ली इथे  पार पडला. या बैठकीत दोन्ही बाजूंनी संरक्षण आणि सुरक्षा, व्यापार आणि गुंतवणूक, शिक्षण, शेती, पारंपारिक औषध, हवामान बदल, क्रीडा आणि दोन्ही देशातील परस्पर संबंध यासारख्या द्विपक्षीय मुद्द्यांचा आढावा घेतला.

**जळगाव**

महाराष्ट्रात जळगाव जिल्ह्यातील यावल वन विभागाच्या अंधारमळी परिसरात राज्यातलं पहिलं ‘डार्क स्काय पार्क’ आकाराला येत आहे. नुकत्याच झालेल्या चंद्रग्रहणाच्या मुहूर्तावर या ऐतिहासिक प्रकल्पाचा प्रारंभ करण्यात आला. देशातील पहिलं ‘डार्क स्काय पॉलिसी’ राबवणारं राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख निर्माण होईल अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रीय अंतराळ दिनी केली होती.

**CAFAकप**

ताजिकिस्तानमध्ये सुरू असलेल्या CAFA अर्थात मध्य आशियाई फुटबॉल संघटनेच्या फुटबॉल स्पर्धेत भारताने काल ओमानचा पराभव करून कांस्यपदक जिंकलं. भारताकडून उदांता सिंगने बरोबरी साधल्यानंतर निर्धारित वेळेत सामना 1-1 असा संपला. ओमानने पेनल्टी शूटआउटमध्ये पहिल्या दोन संधी गमावल्या आणि गुरप्रीत सिंग संधूने शेवटचा पेनल्टी गोल वाचवून भारताला 3-2 असा विजय

मिळवून दिला. आंतरराष्ट्रीय फुटबॉल सामन्यात भारताने ओमानचा पराभव करण्याची ही पहिलीच वेळ आहे.

**<u>क्रिकेट</u>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धा आजपासून सुरू होत असून अबूधाबी इथं होणाऱ्या पहिल्या सामन्यात अफगाणिस्तान आणि हाँगकाँग यांच्यात लढत होईल. भारताचा पहिला सामना उद्या दुबईत युएई संघाशी तर येत्या 14 तारखेला पाकिस्तान बरोबर होणार आहे. येत्या 28 सप्टेंबरपर्यंत सुरू राहणाऱ्या या स्पर्धेच्या अ गटात भारत, पाकिस्तान, ओमान आणि यूएईचा समावेश आहे. तर ब गटात श्रीलंका, अफगाणिस्तान, हाँगकाँग आणि बांगलादेश यांचा समावेश आहे.

**<u>बॅडमिंटन हॉंगकॉंग</u>**

हॉंग कॉंग 2025 च्या खुल्या बॅडमिंटन स्पर्धा आजपासून सुरु होत आहे. ऑलम्पिक पदक विजेती पी.व्ही. सिंधू भारताच्या वतीनं पहिला सामना डेन्मार्कच्या लाईन क्रिस्टोफर बरोबर होणार आहे. भारताच्या एच.एस.प्रणोय आणि आयुष शेट्टीसह पुरुष एकेरी विभागात लक्ष सेन सहभागी होणार आहे. पुरुष दुहेरीमध्ये सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांचीही  निवड करण्यात आली आहे.

**<u>हवामान</u>**

उत्तर प्रदेशातील प्रयागराज, आग्रा आणि मथुरा यासारख्या जिल्ह्यांमध्ये पूरपरिस्थिती अजूनही गंभीर आहे. यमुनेच्या पाण्याचा सर्वाधिक फटका मथुरा या भागाला बसला असून अनेक निवासी भाग पाण्याखाली गेले आहेत. जिल्हा प्रशासनाच्या आदेशानुसार शाळा आणि महाविद्यालये अजूनही बंद आहेत. मथुरेतील किमान 5,000 लोकांनी मदत छावण्यांमध्ये आश्रय घेतला आहे. प्रसिद्ध बांके बिहारी मंदिराकडे जाणारा रस्ता पूर्णपणे पाण्याखाली गेला आहे. आग्रा इथेही

यमुनेचं पाणी ताजमहालच्या परिसरात आणि इतर सखल भागात घुसलं आहे. दुसरीकडे, प्रयागराज जिल्हाही पूरग्रस्त आहे जिथे गंगा आणि यमुनेच्या पाण्यामुळे शहराचे अनेक भाग पाण्याखाली गेले आहेत .

शेवटी पुन्हा ठळक बातम्या

1. उपराष्ट्रपतीपदासाठी आज निवडणूक; सी पी राधाकृष्णन आणि बी सुदर्शन रेड्डी यांच्यात लढत

2. भारताला पुन्हा एकदा उद्योग आणि ज्ञानाचं जागतिक केंद्र बनवण्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं आवाहन

3. हिमाचल प्रदेश आणि पंजाबमधील पूरपरिस्थितीचा पंतप्रधान नरेंद्र मोदी आज घेणार आढावा

4. नेपाळमध्ये समाज माध्यमांवरील बंदीविरोधात तरुणांनी केलेल्या निदर्शनांना हिंसक वळण; 19जणांचा मृत्यू

आणि

5. 17व्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेला आजपासून दुबईमध्ये सुरुवात; भारताचा उद्या यूएईबरोबर पहिला सामना

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.